# शिक्षण व्यवस्थेमध्ये पालकांची जबाबदारी

**प्रा.प्रकाश हुलेनवर,** मराठी विभाग, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड.

.............................................................................................................................

**प्रस्तावना ः** खरेतर पालक ही संज्ञा अलीकडची.ती आई - बाप या संज्ञेइतकी व्यापक नाही.पंचवीस ते तीस वर्षापूर्वीचे आई - बाप,स्वतःच्या मनगटावर विश्वास ठेऊन मुलांना जगवत होते.त्यांना स्वतःच्या कष्टाबद्दल गर्व होता व कामावर श्रध्दा , निष्ठा होती. अशिक्षितपालकांमध्ये मूलं सांभाळण्यात एक इर्षाच होती.तत्कालीन पालकांना दिवसभराच्या कंटाळयाने शांत झोपेतून जे सुख मिळे त्यातच ते समाधान मानत.वडिलांचा म्हणून एक वेगळा धाक होता.तत्कालीन पालक घरात कधीच उगीच लोळत पडत नसंत आणि कुणी असे लोळत नसत.सकाळपासून ते संध्याकाळपर्य तराबणारे आई - बाप संपूर्ण कुटुंबाचा आदर्श होते.पालकांमध्ये आपुलकी, जिव्हाळा ,प्रेम भरभरून वहात असे.एकत्र कुटूंबात राहूनही घरातील व पाहुण्यारावळयाचें नातेसंबंध जपले जात होते. स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन मुलां बाळांना पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळावीत ही माफक अपेक्षा होती. आई बापाच्या कष्टाला व उपासमारीला बघून मुलांच्या जाणीवा अधिक समृध्द होत होत्या. येणारा दिवस ढकलत ,आनंदात जगणा-या बापमंडळींच्या माफक अपेक्षा होत्या. कर्ज ,व्याज, चैन, सुख या गोष्टींची कल्पनाही नसल्याने फार काही नुकसान होत नसे. तत्कालीन पिढीतील मुलांच्या वाटयाला प्रत्यक्ष जगणे, भोगणे ,सोसने आल्याने त्यांच्या जाणीवा अधिक विकसित झाल्या.आज जे व्यक्तिमत्व घडविण्याच्या अपेक्षेने आपण मूल्यशिक्षण देऊ पाहतोय ते तेव्हा प्रत्यक्ष जगण्यातून मिळत असे. कोणाचे वाईट करू नये हे सांगताना 'कुणाच्या वाळल्या पाचोळयावर पाय देऊ नये' किंवा 'सर्वांचं भलं कर, कल्याण कर' हा अशिक्षित पालकांचा स्वभाव म्हणजे एक प्रकारचे मूल्यशिक्षण होते.मुलांच्याशारीरिक वाढीकडे ,चांगल्या सवयींकडे विशेष लक्ष होते .'खायापियाचा लाड ,नको त्या गोष्टीचा लाड नको' म्हणजे वायफट खर्च करण्याची सवयच नव्हती.चांगल्या गोष्टीसाठी पालकांचा धाक असे.कालांतराने पालकांच्या मानसिकता बदलू लागल्या.राबणा-या पालकांना आपल्यासारखे कष्ट नी उपासमार आपल्या मुलांच्या वाटयाला येऊ नये; ही भावना निर्माण झाली. या भावनेतून 'शिक्षण ' ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी राहिली नाही.दरम्यान शिक्षण प्रत्यक्ष खेडयांपर्यंत पोहचले होते.सुशिक्षित मंडळींचे राहणीमान नोकरीमुळे उंचावू लागले.अशा प्रकारचे नोकरीचे जीवन आपल्या मुलांच्या वाटयाला यावे ,ही अपेक्षा पालकांमध्ये अधिक वृद्धिंगत झाली.शिक्षणामुळे उदरनिर्वाहाचे प्रश्न सुटतील या अपेक्षेने पालक आपल्या मुलांना शिक्षण देण्यास जागरूक झाले.अगदी नव्वदच्या दशकातही पालकांच्या मर्जीनुसार मुले शिक्षण घेत होती.

जागतिकीकरणानंतर एकूण देशाचाच चेहरा मोहरा बदलू लागला.जागतिकीकरण,खासगीकरण आणि उदारीकरणामुळे माणसाचे गि-हाई कातरूपांतर झाले.मानवाचे वस्तूरूपी मूल्य करण्यात येऊ लागले.या काळात अशिक्षितांपेक्षा सुशिक्षित पालकांच्या पुढे पाल्यासंबंधी अनेक आव्हाने ऊभी राहू लागली.खरे तर व्यावहारिक जगात मुलांना कशाप्रकारे शिकवावे ?त्याच्या व्यक्तित्त्वाचा विकास आणि मानसिक विकास कसा साधावा?या विषयी अनेक पदव्या घेण्याच्या सोयी- सुविधा उपलब्ध होऊनही पालकांच्यापुढे वेगळीच आव्हाने उभी राहिली.ज्या सवयी,संस्कार अनुभवातून, जाणीवेतून विकसीत होत होत्या ; हे प्रमाण बरेच कमी झाल्याचे चित्र आपणास दिसते आहे.

जागतिकीकरणानंतरच्या काळात मुलांनासंस्काराच्या गोष्टी जाणून बूजून शिकवाव्या लागू लागल्या.पिढी घडविण्याचे महत्त्वाचे काम शिक्षक आणि पालक करत असले तरी आज 'विद्यार्थी - शिक्षक' या 'गुरू - शिष्या'च्या नात्यात भावनिक रूक्षता निर्माण होतआहे. शिक्षक- विद्यार्थी हे दोघेही 'पगार' आणि 'गुण' या पाठीमागे धावताना दिसते आहे(अपवादात्मक काही लोक सोडून).साधारणतः वीस ते तीस वर्षामागचे शिक्षक अनुभवाने ' प्रौढ' आणि मनाने 'बालक' होते.शिक्षक विद्यार्थ्यांना अध्यापनातून मंत्रमुग्ध करत होते.आजच्या विद्यार्थ्याच्या चेह-यावर जगातले सर्व प्रश्न घेऊन अध्ययन होते आहे.सुखदुःखाचा वाटेकरी असणारा शिक्षक विद्यार्थीप्रिय होता.प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्याला काटीने फोडले तरी शिक्षकांबद्दलचा आदर कमी होत नसे.मी श्री सिध्दनाथ हायस्कूल बाळेखिंडी येथे शिकत होतो तेव्हा ; रस्त्याने जाताना कोणतेही शिक्षक पुढून आले तर सायकलवरून आम्हीमुले खाली उतरत आणि शिक्षक पुढे निघून गेल्यावर पुन्हा सायकलवर बसून पुढे जात असू.अशा अनेक शिक्षक आणि शिक्षणाच्या आठवणी या पिढीकडे आहेत.आपापल्या शिक्षकांबद्दल आजही आदराचे स्थान आहे.माझे शिक्षक भेटल्यावर आजही नतमस्तक होण्यात कोणताच कमीपणा वाटत नाही.शिक्षण हा संस्कार होम, हवन यासारख्या विधीनी होत नाही तर त्याला प्रेम, जिव्हाळा, नम्रता या अंगभूत गोष्टी असाव्या लागतात.

आजच्याशालेय शिक्षणाकडे दिले जाणारेपालकांचे विशेष लक्ष ही जमेची बाजू आहे. आपला पाल्य जगाबरोबर असावा किंबहूना शिक्षणाच्या शर्यतीत तो कुठेच कमी पडू नये यासाठी पालक स्वतः धावतात आणि आपल्या मुलांना धावायला लावणारे पालक पदोपदी दिसतात.

आजचे काही पालक नको तितके जागरूक आणि पाहिजे तेवढेच अंध आहेत.पाहिजे त्या गोष्टीकडे दुर्लक्ष आणि नको त्या गोष्टीत अधिक लक्ष असते ब्रम्हज्ञान सांगणारे पालक ,मुलांच्या अभ्यासाची काळजी करणारे आधुनिक पालक मुलांना उपदेश करताना - अभ्यास कर ,उगीच फिरू नको ,टि.व्ही कितीवेळ बघणार?मोबाईल ठेव आता? असे सांगणारे पालक स्वतः मात्र या सर्व गोष्टींचा अस्वाद घेत घेत उपदेश करत असतात.हा विरोधाभास नाही का? खरे तर नेमकी कुणाच्या स्वातंत्र्यावर गदा आणावयाची हा खरा प्रश्न निर्माण होतो आहे.असे पालक आपल्या पाल्यास पुस्तकांबरोबरच गाईडसची खरेदी करतात किंबहुना पुस्तक न घेता गाईड वापरण्यास परवानगी देतात.खरे तर अभ्यास घेण्यापेक्षा तो कसा करावा हे शिकवायला हवे.कमी मार्कस पडणा-या व नापास मुलांना समजून घ्यायला हवे. गुणवत्तेपेक्षा गुणांना प्राधान्य असणा-या व्यवस्थेबद्दल कोणच बोलत नाही ही तर वस्तूस्थिती. खरे तर पालकांच्याच मानगूटीवर मार्कांचं भूत बसलेलं आहे.सुशिक्षित पालकांच्या केवळ गुणांच्या अपेक्षा आज उंचावलेल्या आहेत.यासाठी 'अगदी केजी टू पीजी' सर्वत्र 'क्लास- शाळा- क्लास' हा प्रवास (कागल- रंकाळा -कागल)या बस सारखे आयुष्यभरासाठी मार्गस्थ

झालेल्या विद्यार्थ्यांची धावाधाव सुरू आहे.अभ्यास एके अभ्यास (वे एके-वे)हे सूत्र सांभाळण्यात पालक व्यस्त आहेत.यामुळेच .इतर वर्गाकडे दुर्ल क्ष करून केवळ १0वी १२ वीला महत्त्व देणारे शिक्षक ,पालक आहेत.केवळ दहावी बारावी साठी विशेष लक्ष देणा-या पालकांची मानसिकता शिक्षणाच्या मूल्यात्मक -हासाला कारणीभूत ठरत आहे.या परीक्षेसाठी काही काळासाठी अतिदक्षता विभागाप्रमाणे काळजी घेणारे पालक घरातील टि.व्ही बंद करतात.अभ्यासासाठी घरात स्मशान शांतता निर्माण करतात,कुणाचाही संपर्क ठेवण्यास मनाई.त्याच्या क्लास,आहारावर लक्ष ठेऊन तणावग्रस्त वातावरणात अपेक्षांचे ओझे घेऊन वावरणा-या पाल्यांची मानसिकता हे प्रश्न गंभीर होत आहेत. अशा प्रकारची आचार संहिता पाळणा-या पालकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे .कारण आपण सुशिक्षित होतो आहे म्हणे!

आपल्या मुलांना सर्वोत्तम शाळा,कॉलेज,वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा औद्योगीक संस्थेत प्रवेश मिळाला नाही तर मुलांबरोबर स्वतःचा अपमान होईल या भीतीने पालक आज धावताना दिसतात.या स्पर्धेसाठी पाहिजे ती किमंत मोजण्यास तयार असणारे पालक गुणांच्या बाजारात कोणतीही पदवी घेण्यास तयार आहेत.आर्थिक समृध्द असणा-या पालकांचीउच्चशिक्षित मुले 'स्पर्धा परीक्षा' या गोंडस नावाखाली अभ्यास वर्तुळात स्वतः किती प्रामाणीक असतात?हाही एक प्रश्न आहेच.असे विद्यार्थी काही दिवस पालकांची फसवणूक करत असले तरी ;आयुष्य फसलेल्या मुलांना सावरणे अशक्य होऊन बसते.अभ्यासाच्या नावाखाली घरातून बाहेर पडणारा विद्यार्थी चैन ,विलासात रमतो.त्याला मित्र -मैत्रिणीच्या सोबतीने काही व्यसनं जडतात. या वयातील केवळ पैशासाठीझालेली मैत्री किंवाशारिरीक आकर्षणामुळे निर्माण झालेली मैत्री,मैत्रीतील गैरविश्वास,वासनांध मैत्री यातून समज - गैरसमज ,अनेकदा हेवे - दावे,छेडछाड प्रकरणे अशा मैत्रीतून निर्माण होणारे पालकांपुढे पेच प्रसंगांचे आव्हान आहे.सामान्य पालकांनी अनेकदा जपून , काटकसरीने जमवून ठेवली पुंजी शिक्षणाच्या नावावर उधळली जाते.खर्च वाढत जातात.पालकांच्या खिशाला न परवडणा-या चैनीमुळे ब-याचदा पालक हतबल होतो.पालकांपुढेया प्रकारची नवी आव्हाने उभी आहेत याचबरोबर सोशल मिडिया हे एक पालकांपुढील आव्हान आहे.फेसबुक,व्हाटसॲप ,ट्विटर यामध्ये गुरफटलेली पिढी पैसा आणि वेळेचा दुरुपयोग करताना दिसते आहे.गैरवर्तन करणा-या मुलांच्या संख्येत दिवसेंदिवस जी वाढ होते अशा अनेक कारणांपैकी सोशल मिडिया हे एक महत्त्वाचे कारण ठरत आहे.या मिडियामुळेचघरातही केवळ व्यवहारिक बोलणे होते आहे.या आणि अशा अनेक कारणांनी कौटुंबीक संवाद कमी होत आहेत.

आजच्या पिढीचाच युवकांचा घरातील संवाद कमी होतो आहे.ही मुलं घरातल्यापेक्षा बाहेरच जास्तकाळ वावरत असल्याने मुलांच्या भाव-भावना पालकांच्या पर्यंत पोहचत नाहीत.पालकांनी केवळ पैसे द्यावेत हीच अपेक्षा बाळगणा-या कुटुंबात व्यवहारिकता येते आहे.कुटूंबातील विसंवाद हा पालकांपुढील महत्वाचे आव्हान आहे.सर्वच युवक किंवा पालक अशाप्रकारचा नकारात्मक ,वरवरचा,भावनाशून्य, किंवा केवळ व्यावहारिक पातळीवरचा विचार करतात असे नाही परंतू याचे प्रमाण कमी होते आहे हे मान्यच करावे लागते .आजचा युवक करियरच्या मागे लागलेला आहे.विविध स्पर्धेची तयारी करतो आहे.त्याच्या पुढचे ध्येय आणि आदर्श वेगळे आहेत.आयुष्यातील ऐन उमेदिचा काळ घालवून विशिष्ट ध्येय ठेऊन शिक्षण घेणारे विद्यार्थी करियरसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात.अशा प्रयत्नातून एखादया गुणांमुळे घसरलेल्या विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होत असते.अशा परिस्थितीत खचून जाणा-या पाल्याचे मनोबल वाढविण्याचे आव्हान पालकांपुढे ऊभे आहे.हे सर्व सांभाळण्यासाठी पालक खंबीर असायला हवेत.जगावरोबरच्या स्पर्धेची जाण असणा-या पालकांनी आपल्या पाल्यास कोणत्याही शर्यतीत उतरवताना त्याची शैक्षणिक कुवत,शारिरीक तंदुरूस्ती,त्याची मानसिकताया गोष्टी लक्षात घेऊन मार्गदर्शकाची भूमिका बजावणे गरजेचे आहे.पालकांची भूमिका मार्गदर्शकाची ,मित्रत्वाची,आधार देण्याची असल्यास अनेक आव्हाने कमी होतील असे मला वाटते खरे तर एका विशिष्ट वयापर्यत पाल्याला चांगल्या वाईटाची जाण यावी अशी पालकांची अपेक्षा असते.सामाजिक भान ही गोष्ट पालकांकडे असेल तरच ती मुलांकडे येईल.आजचे बालक तेच उद्याचे पालकअसतात . पालकांची सामाजिक बांधीलकी जेवढी दृढ तेवढया पाल्याच्या जाणीवा प्रगल्भ होतात.परंपरेने हा सामाजिक वसा एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे जात असतो.पालकांपुढे आजमुलांच्या करिअरची आव्हाने आहेत.वाढता हिंसाचार,अवैद्य मार्गाचा वापर , कमी झालेला संवाद ,वैचारिक भिन्नता,स्वातंत्र्याचा गैरफायदा घेणारे विद्यार्थी ,सोशल मिडियाचा अमर्याद वापर,पाल्याचे सामाजिक,आर्थिक व राजकीय दृष्टिकोणाचे स्वरूप ,बेकारीच्या समस्या, काही युवकांमध्ये अहंकार, स्वार्थ यासारखे मानसिक रोग वाढताहेत . श्रमप्रतिष्ठेला दिले जाणारे दुय्यम स्थान ,कौटुंबिक प्रश्न ,वृध्दापकाळ ही आजच्या पालकांपुढे आव्हाने उभी आहेत.आजच्या पालकांना वाटते ,मुलांनी मागेल ते त्यांना द्यावे कारण आपल्या नावाने पुन्हा ओरड नको.पालकांची बेजबाबदारीमुळे आव्हाने वाढताना दिसतात.मुलं मोठी झाली त्यांना आपोआप कळतं ,कळावं ही अपेक्षा ठेवून पालक आपल्या पाल्यावर दुर्लक्ष करतात.मुलांना उपदेश करायचे वय नाही या विचारांनी आज ,उद्या त्यांना कळेल या भुमिकेतून ते अबोल राहतात.याचा फायदा घेऊन बेहिशोबी मुले स्वतः बरोबर पालकांना फसवत राहतात.

ब्रिटीश कालीन शिक्षणव्यवस्थेत बदल होऊन या शिक्षणव्यवस्थेत स्मरणापेक्षा सृजनाला महत्त्व देणारा अभ्यासक्रम हवा. विद्यार्थ्यांच्या जाणीवा विकसित करण्याचा प्रयत्न पालकांनी करावा.पाल्यांना केवळ समजून सांगत बसण्यापेक्षा त्यांना समज येणे गरजेचे आहे. पालकांनी अपेक्षांचे ओझे लादण्यापेक्षा त्यांच्या अनुभव कक्षा विस्तारण्यासाठी मदत केली तर कोणत्याही परिस्थितीत निर्णय घेण्याची क्षमता विकसित होईल यात शंका नाही.शाळा ,महाविद्यालयातील परीक्षापध्दतीतून केवळ प्रश्नोत्तररूपी जडणघडण करण्यापेक्षा आयुष्याच्या जडणघडणीसाठी मूलभूतगोष्ट म्हणून स्वानुभव,स्वावलंबन आणि स्वातंत्र्य आवश्यक आहे.समाजात गुणांपेक्षा गुणवत्तेला जेव्हा मूल्य प्राप्त होईल तेव्हा भावीपिढीचा सर्वांगीण विकास होई लअसे वाटते.शिक्षकानी व पालकांनी मुलांना वरवरचे काही देण्यापेक्षा त्यांचे अनुभव ,जाणीवा,दृष्टिकोण विकसित केल्यास युवक सक्षम बनतील यात तीळमात्र शंका नाही. मुलांच्या सर्वांगीण वाढीला त्याच्या कौशल्यविकासाला,त्याच्या आवडी -निवडीला ,सृजनशीलतेला योग्य न्याय देण्याची निदान सुशिक्षित म्हणवून घेणा-या पालकांची जबाबदारी आहे.